# श्रीपतराव चौगुले कॉलेजमध्ये ऑनलाईन आंतरराष्ट्रीय चर्चासत्र संपन्न.




एक दिवसीय आॅनलाईन आंतरराष्ट्रीय चर्चासत्रात मार्गदर्शन करताना प्रोफेसर.ए.जी. अमरासिंघे

पर्यावरण आणि मानवी जीवन यांचा अतूट संबंध आहे.पर्यावरण हा आपल्या जीवनाचा आधारस्तंभ असून त्याशिवाय मानवाचे अस्तित्व अशक्य आहे.नैसर्गिक साधनसंपत्ती, हवा,पाणी,वृक्षवल्ली,प्राणी-पक्षी आणि जीवसृष्टी या सर्वांचा समतोल राखूनच मानव आपले जीवन व्यतीत करतो.परंतु औद्योगिकीकरण, शहरीकरण आणि आधुनिक जीवनशैलीमुळे पर्यावरणाचा नाश होत आहे.पर्यावरणाचा मानवी जीवनावर मोठा प्रभाव असतो.शुद्ध हवा,स्वच्छ पाणी,सुपीक जमीन आणि निसर्गसंपत्ती या गोष्टी आरोग्यासाठी अत्यंत महत्त्वाच्या असतात.परंतु,आज औद्योगिक कचरा,प्रदूषण,जंगलतोड आणि प्लास्टिकचा अतिवापर यामुळे पर्यावरण संतुलन बिघडत आहे. परिणामी,हवामान बदल,तापमान वाढ,नैसर्गिक आपत्ती आणि आरोग्यविषयक समस्या वाढीस लागल्या असे प्रतिपादन श्रीलंका येथील केलानिया विद्यापीठाच्या भूगोल विभागातील प्रोफेसर ए.जी. अमरासिंघे यांनी केले.

श्रीपतराव चौगुले आर्ट्स ॲण्ड सायन्स कॉलेज,माळवाडी-कोतोली येथील अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष व सायन्स विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने "पर्यावरण आणि मानवी जीवन" या विषयावर आयोजित केलेल्या ऑनलाईन आंतरराष्ट्रीय चर्चासत्रात मार्गदर्शन करताना प्रोफेसर.ए.जी.अमरासिंघे बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष समन्वयक प्रोफेसर डॉ.बी.एन.रावण होते.

यावेळी डॉ.के.कुमारस्वामी एमेरिटस प्रोफेसर माजी UGC-BSR फॅकल्टी फेलो - ICSSR वरिष्ठ फेलो आणि मिड-करिअर अवॉर्ड भूगोल विभाग,स्कूल ऑफ अर्थ सायन्सेस भारतीदासन विद्यापीठ, तिरुचिरापल्ली,डॉ.डी.एस. धारवाडकर तोष्णीवाल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय सेनगाव,हिंगोली यांनी मार्गदर्शन केले.

यावेळी सेशन अध्यक्ष म्हणून डॉ. एस.ए.पाटील,डॉ.तरन्नूम मुबारक मुल्ला यांनी काम पाहिले.

या ऑनलाईन आंतरराष्ट्रीय चर्चासत्रासाठी ज्ञानगंगा शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक-अध्यक्ष डॉ.के.एस.चौगुले,संस्था सचिव शिवाजीराव पाटील,डॉ.अजय चौगुले,प्राचार्य डॉ.विजयकुमार पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

या ऑनलाईन आंतरराष्ट्रीय चर्चासत्राचे समन्वयक म्हणून प्राचार्य डॉ.विजयकुमार पाटील व सहसमन्वयक म्हणून सहा.प्रा. के.पी.नाईक,सहा.प्रा.ए.जे.शिंगे यांनी काम पाहिले.

या ऑनलाईन आंतरराष्ट्रीय चर्चासत्रात विविध देशांतील संशोधक,प्राध्यापक,विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत प्रा.टी.एस.कवठेकर यांनी केले आभार प्रा.पी.डी.पाटील व

प्रा.एस.एन.माने यांनी मानले तर सूत्रसंचालन प्रा.आर.बी.जाधव यांनी केले.